# संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची जाहिरात

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९**
**पोलीस आयुक्त, नवी मुंबई**

**जाहिरात क्रमांक पोआ/नमुं/आस्था/पो.भरती-१९/०१/२०१९,** *ठिकाण - नवी मुंबई* *दिनांक २६/०८/२०१९*

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८.०१.२०१९ व दिनांक ०४/०७/२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी ६१ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे

**१ पोलीस शिपाई :**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | १५ | ० | २ | ४ | ४ | ० | ० | ३६ | ० | ० | ० | ६१ |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ४ | ० | १ | २ | २ | ० | ० | १० | ० | ० | ० | १९ |
| महिला | ४ | ० | १ | १ | १ | ० | ० | ११ | ० | ० | ० | १८ |
| खेळाडु | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| प्रकल्पग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| माजी सैनिक | २ | ० | ० | १ | १ | ० | ० | ५ | ० | ० | ० | ९ |
| अंशकालीन पदवीधर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| पोलीस पाल्य | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| गृहरक्षक दल | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| **अनाथ** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | १५ | ० | २ | ४ | ४ | ० | ० | ३६ | ० | ० | ० | ६१ |

Scanned by CamScanner

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे

ड) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकात रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध नाहीत.

३) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी **पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह, (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/ तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये) लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह mahapolice.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर (Home Page) वर व www.navimumbaipolice.gov.in वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.**

**महत्त्वाची टिप:-**

पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशांची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, ठाणे यांना दूरध्वनी क्रमांक ०२२- २५४२७९७९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त, नवी मुंबई या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१९ तथा पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई अथवा पोलीस नियंत्रण कक्ष यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दूरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था/कार्यालयाचे नाव | दूरध्वनी/मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२२-२७५७४९२८ |

(राजकुमार व्हटकर )
अध्यक्ष,
पोलीस भरती समिती २०१९
तथा पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई

Scanned by CamScanner